



"Education through self-help is our motto" – Karmaveer

Rayat Shikshan Sanstha's,

# ARTS AND COMMERCE COLLEGE, PUSEGAON,

Tal.Khatav Dist.Satara - 415502

Reaccredited by NAAC at B++ (CGPA 2.98)

Internal Quality Assurance Cell and Prof. Dr. N. D. Patil Pratishthan, Sangli

Jointly Organize

## One Day Interdisciplinary National Seminar

On

## PROF. DR. N. D. PATIL: LIFE, WORK AND THOUGHT

Wednesday, 12th April, 2023

# CERTIFICATE

This is to certify, that Dr./Prof/Mr./Mrs. Shahid Mustak Mulla from Venutai College, Karad attended as resource person/participated/ presented a research paper entitled ____________ in One Day Interdisciplinary National Seminar on Prof. Dr. N. D. Patil: Life, Work and Thought organized by Internal Quality Assurance Cell, Arts and Commerce College, Pusegaon and Prof. Dr. N. D. Patil Pratisthan, Sangli on 12th April, 2023.

IQAC Coordinator | Coordinator | ARTS & COMMERCE COLLEGE PUSEGAON | Principal

ISSN No 2347-7075
Impact Factor- 7.328
Volume-4 Issue-28

# INTERNATIONAL JOURNAL of ADVANCE and APPLIED RESEARCH



**Publisher: P. R. Talekar**
Secretary,
Young Researcher Association
Kolhapur(M.S), India

**Guest Editor**
Dr. Rajendra Bhosale
I/C Principal
Arts and Commerce College, Pusegaon

Young Researcher Association



"Education through self-help is our motto" Karmaveer

**Rayat Shikkshan Sanstha's**

# Arts and Commerce College, Pusegaon

Tal. Khatav, Dist. Satara-415502 (Maharashtra-India)

NAAC Accredited B++ (CGPA 2.98)

Affiliated to

**Shivaji University, Kolhapur**

## Internal Quality Assurance Cell

**and**

# Prof. Dr. N. D. Patil Pratishthan, Sangli

**Jointly Organize**

**ONE DAY INTERDISCIPLINARY NATIONAL SEMINAR**

**On**

## Prof. Dr. N. D. Patil: Life, Work and Thought

**Day & Date: Wednesday, 12th April, 2023**

**Dr. Rajendra Bhosale**
I/C Principal
Arts and Commerce College, Pusegaon

**International Journal of Advance and Applied Research (IJAAR)** **ISSN – 2347-7075**
**Peer Reviewed Bi-Monthly** **Impact Factor –7.328**
**Vol.4 Issue-28 July-Aug 2023**

**CONTENTS**


| Sr No | Paper Title | Page No. |
|---|---|---|
| 1 | Dr. N. D. Patil's Thoughts on some selected Movements **Dr. Mahesh M. Lohar** | 1-4 |
| 2 | Prof. Dr. N. D. Patil Multidimentional Personality **Dr. Sadashiv Rajaram Bankar** | 5-6 |
| 3 | A study on contribution of Dr. N. D. Patil in the welfare of farmers in India **Mrs. M. B. Sonar** | 7-9 |
| 4 | डॉ.एन.डी.पाटील साहेब यांचे रयत षिक्षण संस्थेतील योगदान **डॉ.राजगे बिरु ज्ञान** | 10-11 |
| 5 | मा.प्रा.एन.डी. पाटील: जीवन व कार्य **श्री. वाघमारे शामराव ज्ञानोबा** | 12-14 |
| 6 | प्रा. एन. डी. पाटीला जी के सामाजिक कार्य एक युगीन बोध **डॉ. आर. पी. भोसले** | 15-16 |
| 7 | किसानों और कामगारों के नेता डॉ. एन. डी पाटील **कु. लिना महादेव कदम** | 17-19 |
| 8 | प्रो. डॉ. एन. डी. पाटील के जीवनकार्य का परिचय **श्री. परशुराम शंकर कांबळे** | 20-21 |
| 9 | महाराष्ट्र भूमि के एक प्रेरणादायक उर्जा सागर: प्रा. डॉ.एन.डी.पाटील **प्रा. बाबासाहेब तुकाराम साबले** | 22-24 |
| 10 | रयत शिक्षण संस्था :- प्रा. डॉ. एन. डी. पाटील **प्रा. डॉ. संजय क्षीरसागर** | 25-27 |
| 11 | प्रा.डॉ.एन.डी.पाटील आणि शेतकरी चळवळ **डॉ. पांडुरंग भोसले, डॉ. सचिन रूपनर** | 28-31 |
| 12 | प्रा.डॉ.एन.डी पाटील यांचे सामाजिक योगदान **प्रा.डॉ.महेश रणदिवे** | 32-34 |
| 13 | एन. डी. पाटील एक समाजभिमुख नेतृत्व **शाहिद मुस्ताक मुल्ला** | 35-37 |
| 14 | प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांचे महाराष्ट्राच्या जडणघडणीतील अमूल्य योगदान **प्रा.डॉ.जयश्री सदाशिव चव्हाण** | 38-40 |
| 15 | प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व आढावा **डॉ.देशमुख सुजाता विश्वजित** | 41-42 |
| 16 | रयत शिक्षण संस्था: प्रा. एन. डी. पाटील **श्री. लोंढे अभिजीत शंकरराव , डॉ. व्ही. जी. कोरे** | 43-45 |
| 17 | डॉ. एन. डी. पाटील : सामाजिकतेची संघर्षयात्रा **प्रा. जाधव प्रविण दत्तात्रय** | 46-47 |
| 18 | डॉ.एन. डी. पाटील यांचे सामाजिक व आर्थिक चळवळीतील योगदान **प्रा. रूपेश रमेश जाधव** | 48-50 |
| 19 | डॉ. एन. डी. पाटील यांचे आर्थिक विचार **डॉ. शिंदे संग्राम रामचंद्र** | 51-52 |
| 20 | डॉ. एन. डी. पाटील यांचे अंधश्रद्धेविरुद्ध मांडलेले विचार आणी कृती **प्रा. किरण गणपत कुंभार** | 53-55 |
| 21 | संघर्षयात्री प्रा.(डॉ.) एन. डी. पाटील जीवनपट **प्रा. सुधीर रामचंद्र धोंगडे** | 56-58 |

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.4 No.28 July-Aug 2023

# एन. डी. पाटील एक समाजभिमुख नेतृत्व

**शाहिद मुस्ताक मुल्ला**
संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
**Corresponding Author-** शाहिद मुस्ताक मुल्ला
**Email**- shahidmullasm93@gmail.com
DOI-10.5281/zenodo.8340584

**प्रस्तावना :**

पुरोगामी चळवळीतील ज्येष्ठ नेते कष्टकरी सामाजिक चळवळीतील कार्याचा वटवृक्ष आणि शिक्षण प्रेमी नेते प्राध्यापक एन डी पाटील अशी ओळख असणाऱ्या या महान आदर्शवादी आणि तत्वनिष्ठ व्यक्तीमत्वाने आपल्या कार्यकर्तृत्वाच्या जोरावर सर्वसामान्यांचे नेतृत्व करत त्यांच्या न्याय हक्कासाठी लढणारा हा लढवय्या नेत्याने महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये समाजकारणामध्ये आपली वेगळीच ओळख निर्माण केली आहे १५ जुलै १९२९ मध्ये एका शेतकरी कुटुंबामध्ये जन्म घेतलेल्या नारायण ज्ञानदेव पाटील यांना महाराष्ट्र 'एनडी सर' म्हणूनच ओळखत असे. कामगार, कष्टकऱ्यांवरील अन्यायाच्या विरोधात सतत संघर्षशील राहणे, याचे एनडींना व्यसनच होते.

त्यांनी संपूर्ण आयुष्य शेतकरी कष्टकरी व पुरोगामी चळवळीसाठी खर्च केले आयुष्याच्या शेवटच्या श्वासापर्यंत एन डी पाटील यांनी आपल्या समाजसेवेचा व राष्ट्र सेवेचा जो वसा घेतला होता तो जपण्याचा प्रयत्न केला समाजामध्ये अनेक प्रकारचे नेतृत्व उदयास येते आणि लयालाही जाते पण काही नेतृत्व असे असतात की त्यांना समाजाची दिव्य वलयांकित आधिसत्ता प्राप्त झालेली असते त्यातीलच एक दिव्य वलयंकित अधिकता प्राप्त असणारे जेष्ठ समाज सुधारक राजकारणी समाजकारणी व समाजाभिमुख नेतृत्व म्हणून एन डी पाटील संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध आहेत त्यांनी समाजकारण ,शिक्षण, सहकार, राजकारण अशा सर्व क्षेत्रांमध्ये निस्वार्थ भावनेने प्रामाणिकपणे व नेटाने कार्य करून आपली वेगळीच ओळख व आपले वेगळेच नेतृत्व महाराष्ट्रामध्ये निर्माण केले त्यांच्या राजकीय व सामाजिक जीवनातील केलेल्या कार्यातूनच त्यांचे नेतृत्व गुण आपणास पहावयास मिळतात स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या सांगण्यावरून; तसेच भाई दाजीबा देसाई यांच्या आग्रहामुळे एनडी शेतकरी कामगार पक्षात सक्रिय झाले व महाराष्ट्राला एक लढवय्या नेतृत्व मिळाले. सामाजिक सुधारणा व राष्ट्रीय स्वातंत्र्यांची चळवळ हे दोन प्रवाह इथल्या राजकीय सामाजिक जीवनात महत्त्वाचे होते. त्यामुळे त्यांच्या सामाजिक व राजकीय कार्यांचा आढावा घेणे महत्त्वाचे ठरते त्यावरच प्रकाश टाकण्याचा हा एक छोटासा प्रयत्न आहे प्रस्तुत शोधनिबंधामध्ये एन डी पाटील यांच्या सामाजिक व राजकीय कार्याचा आढावा घेऊन त्यातून त्यांच्या नेतृत्वाची आधिमान्यता संपूर्ण जनमानसात कशी निर्माण झाली यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न आहे

**उद्दिष्टे-**

1) एन डी पाटील यांच्या नेतृत्वाचा चिकित्सक अभ्यास करणे.
2) एन डी पाटील यांच्या सामाजिक क्षेत्रातील कार्याचा आढावा घेणे.
3) एन डी पाटील यांच्या राजकीय क्षेत्रातील कामगिरीचा आढावा घेणे.
4) एन डी पाटील यांच्या नेतृत्वाला मिळालेली आधिमान्यता अभ्यासणे.

**विषय प्रवेश-**

एन.डी. बदलत्या महाराष्ट्राचे साक्षीदार होते. स्वातंत्र्याचा लढा, संयुक्त महाराष्ट्राचा लढा, सहकारी संस्थांचा विकास, शैक्षणिक आणि औद्योगिक क्रांतीचा विकास, राजकारणातील घराणेशाही आणि जागतिकीकरणाने गोरगरिबांच्या स्वप्नांची केलेली राखरांगोळी त्यांनी उघडया डोळ्यांनी पाहिली. एन.डीं.नी २३ वर्षे राजकारण केले, पण भ्रष्टाचाराचा एकही आरोप त्यांच्यावर झाला नाही. सार्वत्रिक जीवनाइतकेच त्यांचे वैयक्तिक आयुष्यही स्वच्छ होते. १९७६ पर्यंत त्यांचे आणि त्यांच्या पत्नीचे साधे बँक खाते नव्हते. आजच्या राजकारण्यांची बँक खाती तपासली तर त्याची यादी लांबलचक असेल.

प्रा. एन. डी. पाटील म्हटलं की शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी जनतेच्या चळवळीचं नेतृत्व असाच सर्वसामान्यपणे समज आहे. साहेबांची संपूर्ण हयात रस्त्यावरच्या लढाया करण्यात गेली. त्यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या धोरणाच्या विरोधातले अनेक लढे यशस्वी झाले. त्यात संयुक्त महाराष्ट्राचा लढा, कर्नाटक सीमाप्रश्न लढा, शेतमालाला किफायतशीर दर मिळवून देण्याचा लढा, भूमिहीन शेतमजुरांच्या व्यथांकडे लक्ष वेधणारा लढा, ऊस उत्पादक कपाती विरुद्धचा लढा, कृषी पंपावरील वीज

दरवाढीचा लढा, दाभोळच्या एन्रॉन वीज कंपनी विरुद्धचा संघर्ष, वीज भारनियमन विरुद्धचा लढा, साखर निर्यात बंदी विरुद्धचा लढा, महाराष्ट्र राज्य इरिगेशन फेडरेशनच्या शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांचा लढा, अलिकडील आय. आर. बी. कंपनीच्या टोल विरोधातला लढा, तसंच सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाचा लढा असे कितीतरी लढे एनडींच्या नेतृत्वाखाली शांततेने निघून ते यशस्वी झालेत. किंवा आपण असं म्हणू, त्यांच्या लढ्याच्या नेतृत्वाची दखल घेऊन मोर्चाच्या मागण्या शासनाला मान्य कराव्या लागल्यात.एन.डी. आचार आणि विचारात एक आणि नेक होते. ते निरीश्वरवादी होते.

आपल्या सात दशकांहून अधिक काळच्या सामाजिक आणि राजकीय कारकिर्दीत एन. डी. पाटील साहेब कायम शेतकरी, कष्टकरी, तळागाळातील लोकांच्या समस्या सोडविण्यासाठी कटिबद्ध आणि पुरोगामी विचारांशी प्रामाणिक राहिले. उच्च शिक्षित असलेल्या एन. डी. पाटील साहेबांनी सुरुवातीच्या काळात अध्यापनाचे कार्य केले. शिवाजी विद्यापीठ आणि रयत शिक्षण संस्थेत महत्वाची पदे भूषवली. विधानसभा आणि विधानपरिषदेचे सदस्य म्हणून त्यांनी कायमच सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर सभागृहात अत्यंत आक्रमपणे आवाज उठवून ते सोडवण्याचा प्रयत्न केला. सीमाभागातील मराठी भाषिकांच्या हक्कासाठी ते अखेरपर्यंत लढत होते. राजकारणासोबतच राज्याच्या सामाजिक चळवळ, शिक्षण, साहित्य आणि सहकार क्षेत्रात त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे.

शेतकरी-कामगारांचे अनेक प्रश्न त्यांनी धडाडीने सोडविले. गिरणी कामगारांच्या हक्कासाठी सुद्धा त्यांनी मोठा लढा दिला. सतत नवीन विचारांचा ध्यास ही त्यांची ओळख होती. सुमारे २२-२३ वर्ष त्यांनी विधिमंडळ गाजविले. एन.डीं.नी अनेक लढे उभे केले अन् काही प्रमाणात ते यशस्वी केले. लढाई संयुक्त महाराष्ट्राची असो, नामांतराची असो, सीमाप्रश्नांची असो, शनीशिंगणापुरची असो, एक गाव एक पाणवठ्याची असो, सत्याग्रहाची असो, शेतकऱ्यांच्या सेझची असो, नर्मदा आंदोलनाची असो, प्रकल्पग्रस्तांची असो, पुनर्वसनाची असो, अंधश्रध्दा निर्मुलनाची असो, जातपंचायतीची असो की टोलबंदीची असो एन.डी. सर्वत्र असत आणि अग्रभागी असत. वेळ पडली तर तुरूंगात जायलाही ते मागेपुढे पाहत नसत.स्वातंत्र्य चळवळीचा प्रश्न आणि सामाजिक समानतेचा प्रश्न एकत्रित नेण्याचे काम, महाराष्ट्रात 'शेकाप'च्या नेतृत्वाखाली सुरू झाले. एन.डी. पाटील हे त्या विचारधारेचे मूर्तिमंत आदर्श उदाहरण होते.

एनडींची सगळयात मोठी खासियत ही, की 'शेकाप'ने दाभाडी प्रबंधातून स्वीकारलेला मार्क्सवादी दृष्टिकोन खेड्यापाड्यातील शेतकऱ्यांना सोप्या व अत्यंत ओघवत्या भाषेत त्यांनी जन्मभर समजावून सांगितला. १९६० ते १९८२ या काळात महाराष्ट्र विधान परिषदेचे सदस्य म्हणून त्यांनी कामगार; तसेच शेतकऱ्यांच्या प्रश्नांना अत्यंत आक्रमक पद्धतीने वाचा फोडली. सन १९६९ ते ७८ व १९९५ ते २०११ पर्यंत अशी २५ वर्षे 'शेकाप'चे सरचिटणीस या नात्याने त्यांनी असंख्य चळवळी केल्या. आमदारकीच्या गुलालात पाचदा न्हाऊनही ते सत्तेच्या सर्व दुर्गुणांपासून कायम दूर राहिले. मोर्चा, तुरुंग, धरणे हेच त्यांचे जीवन होते. म्हणूनच वयाच्या ८१व्या वर्षीदेखील धुळे जिल्ह्यात, आदिवासी शेतकऱ्यांच्या जमीन हक्काच्या लढ्याला पाठिंबा देण्यासाठी एनडी तीरासारखे धावून गेले होते. शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील 'पुलोद' सरकारमध्ये सहकारमंत्री म्हणून कापूस खरेदी एकाधिकार योजनेची सर्वांत यशस्वी अंमलबजावणी त्यांनी केली. शेतकऱ्यांच्या कापसाचे पैसे तत्काळ मिळण्याची सोय करून, त्यांनी शेतकऱ्यांमध्ये या योजनेची विश्वासर्हता वाढवली. सहकारमंत्री म्हणून त्यांनी बाजार समितीमधील व्यापारी प्रतिनिधींची संख्या कमी करून, हमालांना एका जागेचे प्रतिनिधित्व दिले.

प्रा. एन डी पाटील हे जनसामान्य, कष्टकरी, शेतकरी आणि कामगारांसाठी अतिशय पोटतिडीकीने काम करणारे झुंजार नेते होते. कोणताही प्रश्न ते अभ्यासपूर्ण पद्धतीने मांडत आणि त्याचा सातत्यपूर्ण पाठपुरावा करत. अनेक आंदोलने आणि विधायक चळवळींना त्यांनी नेतृत्व प्रदान केले. राज्य विधान मंडळाचे सदस्य म्हणून दीर्घ काळ काम करणारे प्रा. पाटील आदर्श लोकप्रतिनिधी होते.

सन १९५९मध्ये, आपल्या शेवटच्या आजारपणात कर्मवीर अण्णांनी एनडींना पुण्यात बोलावून घेतले आणि रयत शिक्षण संस्थेची जबाबदारी घ्या, असे सांगितले. एनडींनी जवळपास तीन दशके ती समर्थपणे निभावली. एका बाजूला जागतिकीकरणाच्या रेट्याने शिक्षणाचे खासगीकरण होत असताना व गरीब बहुजन समाजाला शिक्षण परवडेनासे होत असताना, एन.डी. पाटील यांनी भाऊराव पाटील यांचा गरीब बहुजन समाजाला शिक्षित करण्याचा वसा प्राणपणाने जपला. जागतिकीकरणविरोधी कृती समिती, अंधश्रद्धा निर्मूलन समिती, एसईझेडविरोधी लढा, सीमालढा अशा अनेक चळवळींचे अध्वर्यू असलेल्या एनडींनी अनेक पुस्तिका व ग्रंथ लिहून महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळीला वैचारिक दिशा दिली. नवसाम्राज्यवादी युगातील भारतीय लोकशाहीसमोरील आव्हाने हा अखेरपर्यंत त्यांच्या चिंतनाचा व चिंतेचा विषय राहिला. साम्राज्यवाद व धर्मांधता या दोन शत्रूंच्या विरोधात कायम संघर्षरत राहा, हे अखेरपर्यंत सर्वसामान्य कार्यकर्त्यांना त्यांनी सांगितले

एन.डी. विचाराने अन् कृतीने पुरोगामी, प्रबोधनवादी, मार्क्सवादी आणि लेनिनवादी होते. ते म्हणायचे की, वर्गलढयाबरोबरच जातिअंताचा लढा यशस्वी

झाल्याशिवाय समग्र समाजात परिवर्तन घडणार नाही. एन.डीं.नी सर्वसामान्यांचे प्रश्न आपल्या लढ्याचे विषय बनवले आणि त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी आपले आयुष्य समर्पित केले. ते चळवळीतल्या कार्यकर्त्यांना कायम म्हणायचे, "प्रत्येक आंदोलनात, लढयात यश येतंच असं नाही. पण काम आणि लढा थांबवायचा नाही." एन.डीं.नी हे सूत्र आयुष्यभर जपले होते. त्यांच्या सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांना स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ नांदेड, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद आणि शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्याकडून डी.लिट. ही पदवी प्रदान केली होती.

**समारोप-**

गेले ७ दशकं अनेक सामाजिक-राजकीय घडामोडींचे साक्षीदार, धडाडीचे कामगार नेते प्रा. डॉ. एन. डी. पाटील . एन.डीं.नी ज्या चळवळीत आपले आयुष्य घालवले, त्या चळवळी आज कमकुवत आणि वाईट स्थितीत आहेत. याचे दुःख त्यांना जरूर वाटायचे, परंतु ते निराश व्हायचे नाहीत उलट ते अंतर्मुख व्हायचे. 'एन.डीं. च्या दृष्टीने अंतर्मुख होणे म्हणजे जबाबदारी ओळखणे आणि स्वीकारणे होय.' एन.डीं.नी अनेक चळवळींचे नेतृत्व केले पण, चळवळीच्या स्वायत्तेला त्यांनी कधी नख लागू दिले नाही. सर्वसामान्यांच्या दृष्टिकोनातून त्या चळवळीचे किती महत्त्व आहे, या हेतुनेच ते चळवळीशी जोडले गेले

१९९५ पासून पुढील वीसेक वर्षे ते शेकापचे सरचिटणीस राहिले. याकाळात शेती, शिक्षण, सहकार आदी मुद्द्यांवर प्रभावी संसदीय राजकारण करण्यात एन. डी. पाटलांसारख्या नेत्याचा मोठा वाटा राहिला आहे. त्यांच्या याच नेतृत्वामुळे त्यांना जनमानसामध्ये आधिमान्यता प्राप्त झाली. आज खऱ्या अर्थाने एन डी पाटलांसारख्या समाजकारणातून राजकारण करणाऱ्या नव्हे तर राजकारणातून समाजकारण करणाऱ्या नेत्यांची पिढी निर्माण होण्याची नितांत गरज आहे. एन डी पाटलांसारखे नेतृत्व महाराष्ट्रातला लाभले व त्यांनी निस्वार्थ वृत्तीने महाराष्ट्राच्या समाजकारणात व राजकारणात जे योगदान दिलेले आहे ते खऱ्या अर्थाने वाकण्याजोगे आहे.

**संदर्भ-**

1) 'बदलता महाराष्ट्र' (२००३,पहिली आवृत्ती ) संपा. भास्कर भोळे, किशोर बेडकिहाळ (प्रकाशक - डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमी, सातारा)
2) शेतीमालाला किफायतशीर किमतीची हमी आणि घाऊक व्यापाराचे राष्ट्रीयीकरण (पुस्तिका ) १९६३
3) नववे विचारवेध संमेलन परभणी, अध्यक्षीय भाषण , २००१ (नवसाम्राज्यवादी युगातील भारतीय लोकशाही समोरील आव्हाने )
4) डॉ. ना. रा. खेकाळे - 'राजकीय नेतृत्व' श्री मंगेश प्रकाशन (नागपूर)
5) Mr.Ganesh Lomte Patil- राजकारणात यशस्वी होण्यासाठी... राजकीय नेतृत्व कौशल्य..! Orchid Publication , pune.
6) दैनिक- महाराष्ट्र टाइम्स- १७ जानेवारी २०२२
7) दैनिक पुढारी- १७ जानेवारी २०२२

**Chief Editor**

**P. R. Talekar**

Secretary,

Young Researcher Association, Kolhapur(M.S), India

**Editorial & Advisory Board**

| | | |
|---|---|---|
| Dr. S. D. Shinde | **Dr. M. B. Potdar** | **Dr. P. K. Pandey** |
| Dr. L. R. Rathod | Mr. V. P. Dhulap | Dr. A. G. Koppad |
| Dr. S. B. Abhang | Dr. S. P. Mali | Dr. G. B. Kalyanshetti |
| Dr. M. H. Lohgaonkar | Dr. R. D. Bodare | Dr. D. T. Bornare |

**Guest Editor**

**Dr. Rajendra Bhosale**

I/C Principal

Arts and Commerce College, Pusegaon

**Guest Editorial Board**

| | | |
|---|---|---|
| Dr. Sanjay Kshirsagar | Manuja Sonar | Shahaji Mali |
| Lalasaheb Pawar | Kiran Kumbhar | Hanumant Nimase |
| | Pradeep Gaikwad | |